# बृहन्मुंबई महानगरपालिका
# देवनार पशुवधगृह
## लघुदरपत्रिका सुचना

महापालिका आयुक्त , बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी खालील दिलेल्या कामासाठी सील बंद दरपत्रिका त्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यावसायिकाकडून / कंत्राटदाराकडून दरपत्रिकेसोबत दिलेल्या नकाशा, कामाचे वर्णन, प्रारुप दरपत्रिका, तसेच दिलेल्या अटी व शर्तीवर मागविण्याचे ठरविलेले आहे.

| अ क्र. | कामाचा तपशील | ईसारा अनामत रक्कम | दरपत्रिका शुल्क | कंत्राटदारांच्या आवश्यक अर्हता | नियत दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1. | बकरी ईद 2024 च्या कालावधीमध्ये देवनार पशुवधगृह उभारण्यात येणा-या तात्पुरत्या दवाखान्यामध्ये वैद्यकीय सेवा पुरविण्याकरीता वैद्यकीय व इतर कर्माचारी वर्ग 15 दिवसांकरिता नेमणुक करण्याकरिता. | रु.6000/- | रु.330/- + 18% GST | अ) कंत्राटदार बृहन्मुंबई महानगरपालिकेचा विक्रेता (वेंडर) असणे आवश्यक आहे..<br>ब) अशाप्रकारच्या वैद्यकीय सेवा पुरविण्याच्या कामाचा / पुर्वानुभव वैद्यकीय संबधित कामाचा अनुभव असने आवश्यक आहे.<br>ड) वरिल अ व ब पुष्ठ्यर्थ संबधित कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. | 24.05.2024 |
| | बकरी ईद 2024 च्या कालावधीमध्ये देवनार पशुवधगृह दवाखान्यामध्ये वैद्यकीय अधिकारी व इतर कर्माचारी वर्ग 15 दिवसांकरिता नेमणुक करण्याकरिता. | रु.6000/- | रु.330/- + 18% GST | अ) कंत्राटदार बृहन्मुंबई महानगरपालिकेचा विक्रेता (वेंडर) असणे आवश्यक आहे..<br>ब) अशाप्रकारच्या वैद्यकीय सेवा पुरविण्याच्या कामाचा / पुर्वानुभव वैद्यकीय संबधित कामाचा अनुभव असने आवश्यक आहे.<br>ड) वरिल अ व ब पुष्ठ्यर्थ संबधित कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. | 24.05.2024 |

वर उल्लेख केल्याप्रमाणे दरपत्रिकेचे शुल्क अधिक 18 टक्के GST म.न.पा.च्या नागरी सुविधा केंद्रामध्ये भरल्यानंतर महाव्यवस्थापक देवनार पशुवधगृह यांचे कार्यालय दुसरा मजला गोवंडी मुंबई-400043 या ठिकाणी नियत दिनांक दिवशी दु.12.00 पर्यंत कोणत्याही दिवशी साप्ता. सुट्टी तसेच सार्वजनिक सुट्टी सोडून सोमवार ते शुक्रवारी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत उपलब्ध होतील. दरपत्रिकेचे शुल्क भरुन त्याची पावती नमुना दरपत्रिका घेण्यासाठी सोबत सादर करावी.

तसेच ईसारा अनामत रक्कम नियत दिनांका दिवशी दु. 12.00 पर्यंत कोणत्याही दिवशी साप्ता. सुट्टी तसेच सार्वजनिक सुट्टी सोडून सोमवार ते शुक्रवारी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत म.न.पा.च्या नागरी सुविधा केंद्रामध्ये येथे भरुन त्याच्या पावतीची छायांकित प्रत दरपत्रिकेच्या सील बंद लखोट्यावरती चिटकविण्यात यावी. ईसारा अनामत रक्कम फक्त डी.डी किंवा रोख रक्कमेद्वारे स्विकारण्यात येईल. चेक स्विकारण्यात येणार नाहीत.

सील बंद दरपत्रिकेवर प्रति:- महापालिका आयुक्त ,बृहन्मुंबई महानगरपालिका असा पत्ता लिहावा व महाव्यवस्थापक देवनार पशुवधगृह यांचे कार्यालयात नियत दिनांका दिवशी दुपारी 05.00 वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी पोहचतील अशाप्रकारे पाठविण्याची व्यवस्था करावी.

सही/-<br>
महाव्यवस्थापक<br>
(देवनार पशुवधगृह)